<u>प्रेसनोट</u>

जळगांव

दि.२२.०३.२०२५

**नितीन भिमराव ब्राम्हणे,वय ३७ वर्षे, ग्रामसेवक, खर्दे बुद्रुक,ता.धरणगाव जि.जळगांव यांनी २५,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत...**

---

यातील तक्रारदार यांनी खर्दे बुद्रुक गावी कॉक्रीट गटार बांधण्याचे २,००,०००/—रुपयांचे व गावहाळ बांधण्याचे ७०,०००/—हजार रुपयांचे असे एकुण २,७०,००० /—रुपयांची २ कामे केलेली आहेत. त्यापैकी त्यांना कॉक्रीट गटार बांधण्याचे कामाचा १,९५,०००/— रुपयांचा व गावहाळ बांधण्याचे कामाचा ६९,०००/—रुपयांचे असे एकुण २,६४,०००/—रुपयांचे २ चेक आलोसे यांचेकडुन काही दिवसांपुर्वी मिळाले आहेत. सदरचे दोन्ही चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन आलोसे यांनी तक्रारदार यास दि.२१.०३.२०२५ रोजी फोन करुन सदर रकमेच्या १० टक्के प्रमाणे २५,०००/—रुपये लाचेची मागणी केली होती. तसेच तक्रारदार यांचा मित्र कुणाल किशोर इंगळे,रा.साळवा,ता.धरणगाव यास देखील फोन करुन तक्रारदार यांना पैसे देण्याविषयी कळवले होते. बाबत तक्रारदार यांनी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर लाचमागणी तक्रारीची दि.२२.०३.२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता तक्रारदार यांनी खर्दे बुद्रुक गावी बांधलेल्या कॉक्रीट गटार व गावहाळ बांधण्याचे दोन्ही कामांचे एकुण २,६४,०००/—रुपयांचे २ चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन, लाच रक्कम देणे संदर्भात तक्रारदार यांचे मित्र कुणाल किशोर इंगळे यास फोन करुन तक्रारदार यांचे सोबत बोलणे करुन होते.

त्यानंतर झालेल्या यशस्वी सापळा कारवाई दरम्यान ११.४५ वाजेचे सुमारास एरंडोल— धरणगाव रत्यावरील मुसळी फाटयाजवळ असलेल्या हॉटेल स्वराज टपरीचे मागे आडोशाचे ठिकाणी वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांचे यांचेकडुन खर्दे बुद्रुक गावी कॉक्रीट गटार व गावहाळ बांधण्याचे करण्यात आलेल्या २,६४,०००/— रुपयांच्या कामाचे दोन चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन सदर रकमेच्या १० टक्के प्रमाणे २५,०००/— रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द धरणगांव पोलीस स्टेशन ११९/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे द्रि.२२.०३.२०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.श्रीमती शर्मिष्ठा घारगे—वालावलकर, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.जळगांव हे करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगांव तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणीही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील खालील नमुद कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली वा तक्रारीबाबत माहीती पाहीजे असल्यास खालील नमुद दुरध्वनी क्रमांकावर सपंर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लॅन्डलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नंबर १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८,२५७८२३० | १०६४ |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | १०६४ |
| ३ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२—२३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४—२३०००९ | १०६४ |

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव सत्यमेव जयते

**योगेश जी. ठाकूर**
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव